नियमित दिवाणी दावा क्र.२३/२०२५
दिपक वि.शिवदास
नि. क्र.२१ खाली

**वादीतर्फे वकील श्री सुधांशु रोटकर यांच्या मार्फत शपथेवर सुरू**

१४. माझे शपथपत्रातील मजकुर हा माझे सांगण्याप्रमाणे लिहलेला असुन तो मी वाचुन त्यावर सही केली आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो **नि. क्र. २१** वर आहे.
१५. आता मला खालील कागदपत्रे दाखविण्यात आले त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यास अनुक्रमे निशाणी क्रमांक देण्यात येते.

| **अ.क्र** | **कागदपत्रांचा तपशील** | **दिनांक** | **निशाणी क्र.** |
|---|---|---|---|
| १ | हक्क सोड पत्र | – | **२२** |
| २ | लीगल नोटीस | – | **२३** |

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास वादीच्या वकीलातर्फे श्री कुशवाहा यांच्यामार्फत शपथेवर सुरू**

१६. मी प्रस्तुतची केस हक्कसोड पत्र कॅन्सल करण्यासाठी टाकलेली आहे. जमीनीची किंमत मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की मला हक्क सोड रद्दबातल करण्याचा अधिकार नाही. मी जमीन वडीलोपार्जीत असल्याचे कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या कडे हक्क सोड पत्र सोडुन इतर कोणतेही दस्तवेज नाही. हे म्हणणे खरे नाही की मी तुळशीदासचा मुलगा असल्याचे दस्त अभिलेखावर नाही. अभिलेखावर मी माझे आधार कार्ड दाखल केले आहे. मी तुळशीदास व मोहन नाईक यांचे वारस प्रमाण पत्र काढलेले नाही. मोहन नाईक यांना सहा एकर जमीन होती त्याचा काही पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की तुळशीदास यांची स्वतकष्टाची जमीन आहे. साक्षदार स्वतःहून सांगतो की मला प्रश्न समजलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की तुळशीदास याची स्वतःची जमीन आहे. साक्षदार स्वतःहून सांगतो की माझ्या वडीलांची वडीलोपार्जीत जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

दिनांक १७.०२.२०२६

श्रवणोत्तर स्वीकृत/ समक्ष

स्वा/–
(क्यु. आर. सय्यद)
२रे सह दिवाणी न्यायालय,
कोर्ट नं.३ कामठी